सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

# भूमि अभिलेख विभाग

दिनांक - १३/०१/२०२३ HELPLINE NUMBER- ०२०- २५७१२७१२

## सरळसेवा भरती २०२१

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक) संवर्गाकरीता सुरू असणाऱ्या पदभरती प्रक्रियेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दाखल रिट याचिका (स्टँ.) क्र. ३१६४३/२०२२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०९/०१/२०२३ रोजी आदेश पारीत करुन याचिका फेटाळलेली आहे.

मा. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळलेली असल्याने IBPS कंपनीला सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार निकाल तयार करुन प्रत्येक विभागाकरीता नमुद सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून निवड सुची सादर करण्याकामी कळविण्यात आले आहे. दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १० नुसार पदभरतीकामी उपलब्ध पदांनुसार निवडसुचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांच्या संख्येचे प्रमाण वेगवेगळे असल्यामुळे निकाल तयार करण्यास काही वेळ लागत असल्याबाबत IBPS कंपनीने कळविले आहे.

त्या अनुषंगाने भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ संवर्गातील रिक्त पदे भरण्याकामी दिनांक २८ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेचा निकाल या संकेतस्थळावर पुढील आठवड्यात जाहीर करण्यात येणार आहे.

स्वा./-XXX

(एन. के. सुधांशु) भा.प्र.से.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक

भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य), पुणे